एमएमआरडीए
MMRDA

# MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

(A Govt. of Maharashtra Undertaking)

**New office building, Plot Nos. R-5, R-6 and R-12, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai – 400 051.**

**Tel: 022-26597586, e-mail: bbrsdp@mailmmrda.maharashtra.gov.in Website: https://mmrda.maharashtra.gov.in**

# NOTICE

## No. TCP (P-1)/BBRS/Misc./6.336/707/2019 (UNDER SECTION 37 (1) OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING Act, 1966)

Whereas, the Government of Maharashtra (hereinafter referred to as “GOM”) has appointed the “Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as “the Authority”) established under the section 3 of the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974, to be the Special Planning Authority for the area comprising Block III to VI of the Back Bay Reclamation Scheme (hereinafter referred to as “BBRS”) vide Urban Development Department Notification No. BBR/1082/CR -140/1687/UD, dated 15th June,1983 promulgated in exercise of its powers conferred by section 40 (1) (c) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”)

And whereas, in exercise of its powers under Section 40 (3) (d) of the said Act, the GOM, by its Urban Development’s Notification No. BBR/1092/60/CR-6/92/UD-11, dated 3rd June, 2000 and dated 17th March 2001 has sanctioned the Development Plan of BBRS (herein referred to as the “said Plan”) submitted by the Authority;

And whereas, the Plot No. 119 ‘A’ and 105 is shown for “School” and “Parking” respectively in the said Development Plan and the plot approx. 30,000 sq. m. behind the plot no. 105 is shown as “Garden & Play Ground” in the said Development Plan;

And whereas, due to parking problems and heavy traffic in the said area, from planning point of view, the Authority in its 147th meeting held on 27th February, 2019 has resolved to modify the reservations as stated below in the sanctioned Development Plan of Back Bay Reclamation Scheme under section 37 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966:

(i) To change the reservation of plot no. 119 ‘A’ from ‘School’ to ‘Parking’;
(ii) To change the reservation of plot no. 105 from ‘Parking’ to ‘School’;
(iii) To carve out the required play ground plot of approx. 2,500 sq. m. for the proposed School on plot no.105 from the adjoining Bay View Marina Garden admeasuring approx. 30,000 sq.m.

And whereas, for the above proposed change of reservation purpose, Authority has authorised the Metropolitan Commissioner to publish this notice inviting suggestions and / or objections from public;

Now, therefore this notice is hereby published under section 37 of the said Act for inviting suggestion and objections from public for the said modification;

These suggestions and/or objections should be communicated in writing, within one month from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette, to the Chief, Town and Country Planning Division, Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA), New MMRDA office building, plot Nos. R-5, R-6 and R-12, ‘E’, block, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai 400 051. The part plan showing the proposed modification is available for inspection of the public in the office of the Chief, Town and Country Planning Division, on all working days during office hours.

The Notice and part plan of the Sanctioned Development Plan showing the said modification is also available on MMRDA’s website at **https://mmrda.maharashtra.gov.in**

Sd/-
**R.A. Rajeev,**
**Metropolitan Commissioner**

**Mumbai.**
**Date: 03/07/2019**

Fulrani

एम एम आर डी ए
MMRDA

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

नविन प्रशासकिय इमारत, प्लॉट क्र. आर-५, आर-६ व आर-१२, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१, महाराष्ट्र.
दुरध्वनी : ०२२-२६५९७५८६, ई मेल : bbrsdp@mailmmrda.maharashtra.gov.in वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in

## नोटीस

**क्रमांक टीसीपी (पी-१)/बीबीआरएस/संकीर्ण/६.३३६/७०७/२०१९**
**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये)**

ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अनुसार कलम ३ अन्वये स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (या पुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) बॅकबे रिक्लमेशन स्कीम मधील ब्लॉक ३ ते ६ या अधिसूचित क्षेत्रासाठी (या पुढे ज्याचा उल्लेख "बीबीआरएस" असा करण्यात आला आहे) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या अधिसूचना क्र. बीबीआर/१०८२/सी-आर/४०/१६८७/न.वि., दिनांक १५ जून, १९८३ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (या पुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ४०(१) (सी) अन्वये नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाचा कलम ४०(३) (डी) अनुसार शासनास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक बी बी आर/१०९२/६०/सीआर-६/९२/न.वि-११ दिनांक ३ जून, २००० व दिनांक १७ मार्च, २००१ रोजी अन्वये वरील क्षेत्राचा विकास आराखडा (या पुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास आराखडा" असे करण्यात आला आहे) मान्य करण्यात आला होता.

आणि ज्याअर्थी, उक्त विकास आराखडयामधील भूखंड क्र.११९ 'अ' व १०५ हे अनुक्रमे शाळा व पार्किंग या प्रयोजनासाठी दाखविले आहेत. तसेच उक्त विकास आराखडयामध्ये सुमारे ३०,००० चौ. मी. क्षेत्राचा भूखंड (भूखंड क्रमांक १०५ मागील) हा गार्डन व प्ले ग्राऊंड प्रयोजनासाठी दाखविलेला आहे.

आणि ज्याअर्थी, नियोजनाच्या दृष्टीकोनातून सदर परिसरातील पार्किंगची समस्या, वाहतूकीची समस्या इत्यादी लक्षात घेता प्राधिकरणाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या आपल्या १४७ व्या बैठकीत बॅकबे रिक्लेमेशन स्कीमच्या मंजूर आराखडयामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम ३७(१) अन्वये खालीलप्रमाणे आरक्षणात बदल करण्यासाठी मान्यता दिली आहे.

(१) भूखंड क्र.११९ 'अ' हया भूखंडाचे शाळा हे आरक्षण बदलून "पार्किंग" असे करणे.
(२) भूखंड क्र. १०५ हया भूखंडाचे पार्किंग हे आरक्षण बदलून "शाळा" असे करणे व
(३) प्रस्तावित शाळेसाठी लागणाऱ्या प्ले ग्राऊंडसाठी अंदाजे २,५०० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड क्र. १०५ च्या जवळच्या बे व्हूय मरीना गार्डन अंदाजे ३०,००० चौ.मी. हया भूखंडामधून विभाजित करुन शाळेसाठी लागणाऱ्या प्ले ग्राऊंडसाठी आरक्षित करणे.

ज्या अर्थी आता, प्राधिकरणाने प्रस्तावित आरक्षणात बदलाबाबत जनतेकडून सूचना व/वा आक्षेप मागविण्यासाठी ही नोटीस प्रसिद्ध करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

त्याअर्थी आता, प्राधिकरण याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील तरतुदींन्वये बॅकबे रिक्लमेशन स्कीम मंजूर नियोजन प्रस्तावांमध्ये वरीलप्रमाणे आरक्षणात बदलाबाबत जनतेकडून सूचना आणि/किंवा आक्षेप मागवण्यासाठी ही नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे,

ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अशा सूचना आणि/किंवा आक्षेप लेखीस्वरुपात प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नविन प्रशासकीय इमारत, प्लॉट क्र. आर-५, आर-६ व आर-१२, 'ई'-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ यांना लेखी कळविण्यात याव्यात. प्रस्तावित आरक्षणात बदल दर्शविणारा भाग नकाशा, प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांच्या प्राधिकरणातील कार्यालयामध्ये सर्व कार्यालयीन कामकाजाच्या वेळात पाहणीसाठी उपलब्ध आहे.

उक्त फेरबदल दर्शवणारा नकाशा व नोटीस प्राधिकरणाच्या https://mmrda.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
**आर. ए. राजीव**
**महानगर आयुक्त**

**मुंबई.**
**दिनांक : ०३/०७/२०१९**

Fulrani